# राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २२/०७/२०२४ अखेरचा खरीप हंगाम २०२४-२५ चा साप्ताहिक अहवाल.

- **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण व नागपूर विभागात बहुतांश ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. कोल्हापूर व अमरावती विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर व लातूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

- **खरीप हंगाम-२०२४-२५ :**

- **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४२.०२ लाख हेक्टर असून दि.२२ जुलै, २०२४ अखेर १२८.९४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर असून १३०.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (८५%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.२३.०७.२०२३ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र ११५.४१ लाख हे. (सरासरीशी ७५%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र ११४.२५ लाख हे. (सरासरीशी ८०%) होते.

- भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे प्रगतीपथावर आहेत.
- पुर्नलावगड झालेले भात व नाचणी पिके रोपे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग, कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
- पेरणी झालेली इतर पिके उगवण, रोप ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- नवीन आडसाली ऊसाची लागण सुरु असून हंगामी, सुरु व खोडवा ऊसामध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**पर्जन्यमान (२०२४)**

दि.१ जून ते २२ जुलै, २०२४ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ४४२.४ मि.मी. असून दि.२२ जुलै, २०२४ पर्यंत ५४५.० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२३.२ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२२.०७.२०२३ अखेर ४२२.१ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ९५.४ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.२२ जुलै, २०२४ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | ---- |
| २ | २५ ते ५० % | ० | ---- |
| ३ | ५० ते ७५ % | १ | नाशिक, |
| ४ | ७५ ते १०० % | ४ | नंदुरबार, पुणे, कोल्हापूर, अमरावती, |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २९ | ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगांव, धुळे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, परभणी, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. |

राज्यात दि.१८ जुलै, २०२४ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ० तालूक्यात ० ते २५%, २ तालुक्यात २५ ते ५०%, १४ तालुक्यात ५० ते ७५%, ४७ तालूक्यात ७५ ते १००% तर २९२ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

### ❖ नैसर्गिक आपत्ती :


दि.२२ जुलै, २०२४ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे, जुलै-२०२४ मधील पावसामुळे शेती व फळपिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये ३९५८२.२१ हे. क्षेत्र बाधित झाले आहे.

### ❖ किड व रोग :


राज्यात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, खोडमाशीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटकनाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी
(दि.२२ जुलै, २०२४ अखेर)



## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२२ जुलै, २०२४ अखेर)




## विभाग निहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१४ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर २.४३ लाख हेक्टर क्षेत्रावर (५९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे प्रगतीपथावर आहेत.
  - पुर्नलावगड झालेले भात व नाचणी पिके रोपे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
  - तूर, मूग, उडीद, तीळ, कारळे या पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.
  - सततच्या मुसळधार पावसामुळे भात पिक रोपे कूजणे, शेतात गाळ साचणे तसेच फळपिकांचे नुकसान झाले आहे.
- **किड व रोग** : निरंक.

### नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.६५ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर १८.४५ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. पुरेशा पावसामळे पेरणीच्या कामांना वेग आला आहे.
  - भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
  - पुर्नलावगड झालेले भात पिक रोपे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
  - इतर पेरणी झालेली पिके उगवण, रोप ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
  - आडसाली ऊसाची लागण सुरु असून हंगामी, सुरु व खोडवा ऊसामध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर अमेरिकन बोंड अळी, खोडमाशीचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## पुणे विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर १२.८० लाख हेक्टर क्षेत्रावर (१२०%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
- पुर्नलावगड झालेले भात व नाचणी पिके रोपे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
- बाजरी पिक फुटवे फुटणे ते वाढीच्या अवस्थेत आहे.
- पेरणी झालेली इतर पिके उगवण, रोप ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर मावा तुडतुडे, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.२८ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर ६.६२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
- पुर्नलावगड झालेले भात व नाचणी पिके रोपे ते वाढीच्या अवस्थेत असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- ज्वारी, बाजरी, मका, तूर, सोयाबीन, उडीद, मूग पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
- पेरणी झालेली पिके उगवण, रोप ते वाढीच्या अवस्थेत असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- नवीन आडसाली ऊसाची लागण सुरु आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळया खोडकिडीचा, ज्वारी पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## छ.संभाजीनगर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर २०.२१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस, भूईमूग पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण, रोपे ते वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी उडीद पिकामध्ये मर/मुळकूज रोगाचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## लातूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर २६.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण, रोपे ते वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, उंट अळी, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.५९ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर २९.७६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९४%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- विभागात खरीप हंगामातील मका, ज्वारी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
- पेरणी झालेली पिके रोप ते वाढीच्या अवस्थेत असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर खोडमाशी, उंट अळी या किडींचा व मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१५ लाख हेक्टर असून, दि.२२ जुलै, २०२४ अखेर १२.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर (६३%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
- सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी पिकांच्या पेरणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- पेरणी झालेली ज्वारी, सोयाबीन, तूर, कापूस पिके उगवण, रोप ते वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर खोडकिडीचा, कापूस पिकावर मावा, तुडतुडे या किडींचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, तंबाखुवरील पाने खाणारी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

❖ **प्रधानमंत्री पिक विमा योजना (खरीप-२०२४)** (दि.२२.०७.२०२४ अखेर) **:**

- **शेतकरी सहभाग संख्या : १४९.७४ लाख**
- **विमा संरक्षित क्षेत्र : ९९.२४ लाख हे.**

# महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम २०२४-२५ मधील मुख्य पिकाखालील दि.२२.०७.२०२४ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | पिके | पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागील वर्षाची दि.२३.०७.२०२३ रोजीची पेरणी | सन २०२४-२५ मधील दि.२२.०७.२०२४ अखेर प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची पाच वर्षाच्या सरासरी क्षेत्राशी टक्केवारी (२०१६-१७ ते २०२०-२१) | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | स्तंभ ५ ची स्तंभ ३ च्या तुलनेत % | स्तंभ ५ ची स्तंभ ४ च्या तुलनेत % |
| १ | भात | १५०८३७४ | ६६३३१७ | ६३१८८७ | ४२ | ९५ |
| २ | खरीप ज्वारी | २८८६१५ | ९०८७१ | ९७०६५ | ३४ | १०७ |
| ३ | बाजरी | ६६९०८९ | २०९५३५ | ३८०८४३ | ५७ | १८२ |
| ४ | रागी | ७८१४९ | १७७३४ | २९५७४ | ३८ | १६७ |
| ५ | मका | ८८५६०८ | ६६४३१० | १००६१९० | ११४ | १५१ |
| ६ | इतर तृणधान्य (राजगिरा, कोडू/कोद्रा, कुटकी, वरई, बार्टी, सावा, राळा, इतर) | ४०४४५ | १०८५६ | १६८८२ | ४२ | १५६ |
| **एकूण तृणधान्य** | | **३४७०२७९** | **१६५६६२४** | **२१६२४४२** | **६२** | **१३१** |
| ७ | तूर | १२९५५१६ | ९६७२२६ | ११६००३५ | ९० | १२० |
| ८ | मुग | ३९३९५७ | १३९१८५ | २२१९६१ | ५६ | १५९ |
| ९ | उडीद | ३७०२५२ | १६२४०४ | ३४४६९१ | ९३ | २१२ |
| १० | इतर कडधान्य (कुळीथ, चवळी, मटकी, राजमा, इतर) | ७८८४५ | २७२०९ | ६०९७१ | ७७ | २२४ |
| **एकूण कडधान्य** | | **२१३८५७१** | **१२९६०२४** | **१७८७६५८** | **८४** | **१३८** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५६०८८५०** | **२९५२६४८** | **३९५०१००** | **७०** | **१३४** |
| ११ | भुईमुग | १९१५७५ | ९७५८० | १३४८९३ | ७० | १३८ |
| १२ | तीळ | १५१६२ | ३५९९ | ६९८७ | ४६ | १९४ |
| १३ | कारळ | १२४६० | २६४२ | १९९६ | १६ | ७६ |
| १४ | सुर्यफुल | १३७८० | ३७७ | ८७६६ | ६४ | २३२५ |
| १५ | सोयाबीन | ४१४९९१२ | ४३८७७०७ | ४८०५९९७ | ११६ | ११० |
| १६ | इतर गळीतधान्य (एरंडी, इतर) | ९४५२ | १७७४ | १५८० | १७ | ८९ |
| **एकूण तेलबिया** | | **४३९२३४०** | **४४९३६७९** | **४९६०२१९** | **११३** | **११०** |
| **१७** | **कापूस** | **४२०११२८** | **३९७८६१०** | **३९८४१२७** | **९५** | **१००** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊस वगळून)** | | **१४२०२३१८** | **११४२४९३६** | **१२८९४४४६** | **९१** | **११३** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित.